MHWS070010732021

दाखल दिनांक : ०२/०६/२०२१
नोंदणी दिनांक : ०२/०६/२०२१
न्यायनिर्णय दिनांक : २४/०३/२०२६
कालावधी : ०४वर्ष०९ म.२२ दि.

# कारंजा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : पी. डी. देवरे)

## न्यायनिर्णय

(दिनांक २४ मार्च २०२६ ला घोषित)

**नि.फौ ख.क्र. ९०/२०२१** **निशाणी क्र.३७**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | प्रथम खबर अहवाल / गुन्हा व पोलीस ठाणे तपशील |
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र शासन द्वारा<br>कारंजा शहर पोलीस ठाणे,<br>ता. कारंजा (लाड), जि. वाशिम.<br>गु.र.न.७१/२०२१ |
| **अभियोगपक्षाचे मा. विधीज्ञ** | सहा. सरकारी अभियोक्ता – श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे. |
| **आरोपी** | **१. जुम्मा चंदु पप्पुवाले**<br>वय :३२ वर्ष, व्यवसाय:मजुरी |

| | |
|---|---|
| | **२. रहिम चंदु पप्पुवाले**<br>वय :२८ वर्ष, व्यवसाय:मजुरी<br>रा. गवळीपुरा, कारंजा, ता. कारंजा जि. वाशिम |
| **आरोपींचे मा. विधीज्ञ** | श्री. अब्दुल माजीद |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हयाचा दिनांक | ३१/०१/२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०१/०२/२०२१ |
| दोषारोप पत्र दिनांक | ०२/०६/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २४/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयास राखीव ठेवल्याचा दिनांक | लागू नाही |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | २४/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | लागू नाही |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार खटल्याकामी आरोपीचा असलेला |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **न्यायाधीन बंदी कालावधी** |
| १. | **जुम्मा चंदु पप्पुवाले** | कलम ४१(१) प्रमाणे नोटिस व समजपत्र | निरंक | कलम ३२४ व ५०६ सह कलम ३४ भा.द.सं. | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | **रहिम चंदु पप्पुवाले** | कलम ४१(१) प्रमाणे नोटिस व समजपत्र | निरंक | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक २४ मार्च २०२६ ला घोषित)

१. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे वाद प्रकरण थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी शकिल रमजान गारवे व आरोपी हे नातेवाईक असून ते सर्वजण गवळीपुरा, कारंजा, ता. कारंजा येथे राहतात.

३. दिनांक ३१/०१/२०२१ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी घरी हजर असताना आरोपींनी त्यांच्या घरासमोर येवून आवाज देवून त्यांना बाहेर बोलावले. त्यामुळे फिर्यादी घराबाहेर आले. आरोपींनी त्यांना 'तुझ्या सोबत बोलायचे आहे, आमचे सोबत बाहेर चल,' असे म्हटले. त्यावेळी फिर्यादी व आरोपी रात्री ०९.१५ वाजताचे सुमारास जुना बस स्टँड चवरे पेट्रालेपंपाजवळ पायी चालत जात असताना आरोपींनी त्यांना 'तु जेथे काम करतो त्या ठिकाणी आम्हाला कामाला लावुन दे' असे म्हटले. फिर्यादीने त्यांना 'सध्या तेथे जागा खाली नाही, त्यामुळे मी तुम्हाला आता माझ्यासोबत घेवून जाऊ शकत नाही,' असे म्हटले असता ते दोघे चिडले. तेथेच लाकडाच्या टालमधुन दोघांनी लाकडी रिप घेवून आरोपी क्र. ०१ जुम्मा पप्पुवाले याने पाठीमागुन फिर्यादीच्या डोक्यावर मारले. आरोपी क्र. ०२ रहिम पप्पुवाले याने फिर्यादीच्या नाकावर, गळयावर व शरिरावर लाकडी रिपने मारुन जखमी केले. धिरज महाजन आणि बिस्मील्ला पठाण यांनी फिर्यादीला आरोपींच्या तावडीतुन सोडविले. दोन्ही आरोपी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून पळून गेले. धिरज महाजन यांनी फिर्यादीच्या पत्नीला घडलेली घटना सांगितली व तिने फिर्यादीला सरकारी दवाखाना, कारंजा येथे उपचाराकरिता नेले. त्यामुळे फिर्यादीने कारंजा शहर पोलीस स्टेशन येथे आरोपींविरुध्द फिर्याद दिली.

४. सदर फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द कारंजा शहर पोलीस स्टेशन, ता. कारंजा येथे गु.र.क्र. ७१/२०२१ भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास भरत लाटे, पो.हे.कॉ. यांनी केला. तपासाअंती पुरावा मिळून आल्याने तपासी अधिकारी यांनी वरील कलमान्वये आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपींविरुध्द निशाणी १९ वर भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या

गुन्हयांकरिता दोषारोप निश्चित केला. आरोपींनी त्यांचे निवेदन निशाणी २० व २१ नुसार त्यांना गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व वाद प्रकरणाची गुणदोषांवर संपरीक्षा व्हावी अशी मागणी केली.

६. सदर खटल्यात मुळ फिर्यादी व जखमी शकील रमजान गारवे यांनी निशाणी २५ ला अर्ज देवून त्यांचेत व आरोपींमध्ये तडजोड झाली असल्याचे सांगितले व तडजोड करण्याकामी परवानगी मागितली. परंतु सदर खटल्यातील भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ हे तडजोड पात्र नसल्याने परवानगी नाकारण्यात आली व खटला पुढे चालविण्यात आला.

७. आरोपींवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने न्यायनिर्णयाचे भाग क मधील साक्षीदारांची साक्ष नोंदविली. आरोपींतर्फे फिर्यादीचे घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा व वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य करण्यात आले. त्यामुळे निशाणी ०१ वरील आदेशाने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

८. अभियोगपक्षातर्फे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होईल अशी कोणतीही परिस्थिती अभिलेखावर आली नाही. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपींचे निवेदन नोंदविले नाही.

९. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा व बचाव पक्षाच्या वतीने करण्यात आलेले युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे निर्णयाकरीता येतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ३१/०१/२०२१ रोजी २१.०० वाजताचे सुमारास गवळीपुरा, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम येथे आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादी शकील रमजान गारवे | |

| | | |
|---|---|---|
| | यांना डोक्यावर, गळयावर, नाकावर लाकडी रिप या मृत्यू होण्याचा संभव असणा–या हत्यारांनी इच्छापूर्वक दुखापत पोहचविली म्हणून भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपटशा करत दहशत निर्माण केली, जिवे मारण्याची धमकी दिली व भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| ३. | आदेश काय? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## !! का र ण मी मां सा !!

**मुद्दे क्र. १ व २ बाबतः–**

१०. साक्षीदार क्र.०१ शकील गारवे, फिर्यादी व जखमी, यांचे पुराव्यामध्ये असे आले आहे की, चार ते पाच वर्षापुर्वी रात्री ०८.३० वाजताच्या सुमारास जुना बसस्टँड, कारंजा येथे त्यांचे व आरोपींचे किरकोळ कारणावरून किरकोळ वाद झाले होते. त्या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. बोलाचालीदरम्यान ते खाली पडल्यामुळे त्यांना डोक्याला दुखापत झाली होती. घटनेच्या दिवशी आरोपींनी त्यांना मारहाण केली नव्हती व जिवे मारण्याची धमकी दिली नव्हती.

११. फिर्यादी हे त्यांच्या जबानी रिपोर्ट/फिर्याद प्रमाणे साक्ष देत नसल्याने अभियोगपक्षाने सदर साक्षीदाराची शोधक उलटतपासणी घेतली; परंतु त्यामध्ये सुध्दा या साथीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. त्यामुळे या साक्षीदाराच्या साक्षीचा अभियोगपक्षाला कोणताही उपयोग होत नाही. याउलट अभियोगपक्षातर्फे त्यांना विचारण्यात आलेल्या सूचक प्रश्नांच्या उत्तरादाखल त्यांनी मान्य केले की, त्यांच्यामधील व आरोपींमधील वाद मिटलेला आहे. त्याबाबतची तडजोड पुरसीस त्यांनी निशाणी २६ वर दाखल केलेली

आहे.

१२. वरील साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन करता असे दिसते की, सा. क्र. ०१ फिर्यादी व जखमी या महत्त्वाच्या साक्षीदाराने फिर्यादीतील घटनेच्या वेळेबाबतचा मजकूर वगळता इतर संपूर्ण घटनाच नाकारलेली आहे. फिर्यादीला आरोपींविरुध्द त्यांनी दिलेली फिर्याद (जबानी रिपोर्ट) दाखविण्यात आली. सदर फिर्यादवर त्यांची सही असल्याचे त्यांनी ओळखले. परंतु त्यातील मजकुराबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. यावरून असे दिसते की फिर्यादीने दिलेली फिर्याद व न्यायालयापुढे दिलेली साक्ष यामध्ये विसंगती आढळून येते.

१३. अभियोगपक्षाने केसकामी तपासलेले महत्त्वाचे साक्षीदार फिर्यादी यांनीच घटना नाकारलेली आहे. फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये तडजोड झाल्यामुळे व आरोपींनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामे व फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केल्यामुळे अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आले नाहीत. वरील परिस्थितीत घटनेच्या दिवशी फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये नेमकी काय घटना घडली याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

१४. या प्रकरणात उद्देश व तयारी या दोन्ही तत्त्वांचा अभाव आहे. अभियोगपक्षाने आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या ज्या कलमांनुसार दोषारोपपत्र दाखल केलेले आहे, त्याप्रमाणे अनुषांगिक घटक हे फिर्यादी यांनीच घटना नाकारल्यामुळे अभियोगपक्षाला सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे आरोपींनी फिर्यादी शकील यांना लाकडी रिपने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली व दमदाटी केली हे सिध्द होत नाही. जोपर्यंत आरोपींवरील आरोप संशयापलीकडे सिध्द होत नाहीत तो पर्यंत कायदा आरोपींस निरपराध समजतो. आरोपींचा तो संविधानात्मक हक्क आहे. त्यामुळे वरील परिस्थितीत आरोपींना निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे.

१५. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल दोन आडजात लाकडी रिप या मुल्यहीन व

गैरउपयोगी असल्यामुळे अपील कालावधीनंतर त्यांचा नियमाप्रमाणे नाश कण्याबाबत आदेश करणे योग्य होईल.

१६. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ (१) चे पूर्ततेकामी जामीन दिलेला आहे. सबब, मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष नकारार्थी देवून मुद्दा क्र. ०३ करिता खालील आदेश पारित करित आहे.

## आ दे श

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये आरोपी क्र. १. जुम्मा चंदु पप्पुवाले व आरोपी क्र. २. रहिम चंदु पप्पुवाले यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे पूर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल दोन आडजात लाकडी रिप या मुल्यहीन व गैरउपयोगी असल्यामुळे अपील कालावधीनंतर त्यांचा नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पुर्ततेकामी दाखल केलेले जामीन बंधपत्र खटल्याच्या न्यायनिर्णयापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.03.25 18:38:38 +0530

**(पी. डी. देवरे)**

दिनांक: २४/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा (लाड).

## भाग 'क'

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | शकील रमजान गारवे | २७ | फिर्यादी व जखमी |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

### अ. अभियोग पक्षाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३० | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ३१ व ३२ | लाकडी रिप जप्ती पंचनामे |
| ३. | ३३ | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

### ब. बचाव पक्षाची निशाणी यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाचे निशाणी यादी**

| **अनु.क्र.** | **नि.क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |
| २. | ०२ | वकीलपत्र |
| ३. | १९ | दोषारोप |
| ४. | २० व २१ | आरोपींचे गुन्हयाचे निवेदन |
| ५. | २५ | फौ.प्र.सं. कलम ३२०(२) नुसार तडजोड करणेकामी परवानगीचा अर्ज |
| ६. | २६ | मुळ फिर्यादी व आरोपी यांच्यात प्रकरण आपसात मिटल्याबाबत संयुक्त पुरसिस |

**ड. वस्तु/ मुद्देमाल यादी**

| अनु.क्र. | वस्तु/ मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे मुद्देमाल क्रमांक २२/२०२१ | दोन आडजात लाकडी रिप |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.03.25 18:38:44 +0530

(**पी. डी. देवरे**)

दिनांक: २४/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कारंजा (लाड).

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | K. A. Paraswai ( Stenographer Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 24/03/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 24/03/2026 |
| Order uploaded on | :- | 25/03/2026 |